# नवभारत

एप्रिल-मे-जून २०२३



आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

## प्राज्ञपाठशाळामंडळ ग्रंथमालेची

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

| | सुधारित किंमत १ ऑगस्ट २०१६ पासून लागू |
|---|---|
| ◈ **वैदिक संस्कृतीचा विकास** (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ६०० रु |
| ◈ **अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर** (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती (खंड १) | ७०० रु |
| ◈ **अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर** (उत्तरार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती (खंड २) | ७०० रु |
| ◈ **पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास** । डॉ. सुमंत मुरंजन | २२० रु |
| ◈ **प्राज्ञप्रबोध** । श्री. श्री. मा. भावे | २५० रु |
| ◈ **श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ** | १०० रु |
| ◈ **संशोधन साधना** । डॉ. वसंत स. जोशी | १०० रु |
| ◈ **आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास** । ऋग्वेदी | ३५० रु |
| ◈ **वागीश्वरी** । डॉ. गो. के. भट | ७५ रु |
| ◈ **गिर्यारोहण परिचय** । अच्युत खोडवे | ५० रु |
| ◈ **इतिहासाचे तत्त्वज्ञान (दुसरी आवृत्ती)** । सदाशिव आठवले | २५० रु |
| ◈ **प्रस्थानभेद** । (तृतीय मुद्रण) : गंगाधर वामन लेले. | २०० रु |
| ◈ **गीताचिकित्सा** । भाऊ धर्माधिकारी | २०० रु |
| ◈ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)** । सौ. मालती देशपांडे | ५० रु |
| ◈ **बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार** । प. ल. वैद्य | ७० रु |
| ◈ **हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन (संबंधित दु. आ.)** । मे. पुं. रेगे | २३० रु |
| ◈ **पाच पुस्तक-परीक्षणे** । वा. म. कुलकर्णी | १०० रु |
| ◈ **भेदविलोपन : एक आकलन** । अशोक केळकर | ८० रु |
| ◈ **कॉलिंगवुडची कलामीमांसा - एक भाष्य** । रा. भा. पाटणकर | १५० रु |
| ◈ **धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार** । दि. के. बेडेकर | १०० रु |
| ◈ **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार** | २०० रु |
| ◈ **इहवाद आणि सर्वधर्मसमभाव** । मे. पुं. रेगे | २०० रु |
| ◈ **प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा** | २५० रु |
| ◈ **चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान (तृतीयावृत्ती)** । सदाशिव आठवले | २५० रु |
| ◈ **विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे (रसग्रहणात्मक मराठी अनु.)** । वसंत नारगोलकर | २०० रु |
| ◈ **नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन।** द. ना. धनागरे | ७० रु |
| ◈ **प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती** । डॉ. म. अ. मेहेंदळे | ८५० रु |
| ◈ **हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा।** (दु. आ.) : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | ३५० रु |
| ◈ **पाश्चात्त्य नीतिशास्त्राचा इतिहास** । (दुसरी आवृत्ती ) : प्रा. मे. पुं. रेगे. | ३०० रु |
| ◈ **साहित्याचे तर्कशास्त्र** । संपादक : सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे. | ७५० रु |

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. पोस्टेज संदर्भात कार्यालयाशी संपर्क साधावा.
२) व्ही. पी. ची पद्धत नाही. ३) पैसे मनिऑर्डरने/चेकने/ऑनलाईन/ड्राफ्टने पाठवावेत. नेट बँकिंगसाठी बँक तपशील पुढीलप्रमाणे - प्राज्ञपाठशाळामंडळ प्रकाशन, खाते नंबर - 110103130024035, IFSC Code - SVCB0016101

**संपर्कासाठी पत्ता : सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ,** ३०९/३१०, गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)
फोन : (०२१६७) २२०००६, भ्रमणध्वनी : ८१४९९९५९०४ Email ID - ppmwai@gmail.com

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई संचालित मासिक

# नवभारत

वर्ष ७६ / अंक ७-८-९ / जोड अंक
एप्रिल-मे-जून २०२३
चैत्र-वैशाख-ज्येष्ठ-आषाढ शके १९४५
वार्षिक वर्गणी रुपये ५००/-
या अंकाची किंमत रुपये १५०/-

या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्राज्ञपाठशाळामंडळ सहमत असतीलच, असे नाही.

## नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणा-या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणा-या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणा-या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

* नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

**प्राज्ञपाठशाळामंडळ**
**अध्यक्ष व विश्वस्त :**
सरोजा भाटे

**प्रमुख संपादक :**
अशोक कृष्णाजी जोशी
भ्रमणध्वनी : ९४२२०६४९७५

**संपादक मंडळ :**
राजेंद्र प्रभुणे
शंतनू अभ्यंकर
नीरज हातेकर
सलील वाघ

**संपादकीय पत्रव्यवहार :**
संपादक, नवभारत मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, ३०९/३१०,
गंगापुरी, वाई - ४१२ ८०३ (जि. सातारा).
दूरध्वनी : (०२१६७) २२०००६
ई-मेल :- ppmwai@gmail.com

**व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**
सौ. नीता गायकवाड
व्यवस्थापक, नवभारत मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळामंडळ, ३०९/३१०,
गंगापुरी, वाई - ४१२ ८०३ (जि. सातारा).
भ्रमणध्वनी : ८१४९९९५९०४

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच, असे नाही.

# नवभारत

**एप्रिल-मे-जून २०२३**

**जोड अंक**

## अनुक्रमणिका

---

✦ **संपादकीय** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ७

### भाग - १

✦ **जुने लेखन**
**हिंदविच्छेदनाची मीमांसा** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ९
**(नवभारत मासिक, ऑक्टोबर १९४७)**
हरि कृष्ण मोहनी

✦ **जुने लेखन**
**हिंदविच्छेदनानंतर** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . १५
**(नवभारत मासिक, डिसेंबर १९४७)**
हरि कृष्ण मोहनी

### भाग - २

✦ **राष्ट्रगुरुंचे पुण्यस्मरण** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . २३
पृथ्वीराजसिंह प्रतापसिंह ठाकूर

✦ **जागतिक धर्मसाक्षरतेचे ‘प्रणेते’ : महाराजा सयाजीराव** . . . . . . . . २९
दिनेश पाटील

✦ **जात-वर्ग जाणिवेचा क्रांतिकारी साहित्यिक : अण्णाभाऊ साठे . . . . . ४८**
व्ही. डी. गायकवाड

✦ **आचार्य वि. प्र. लिमये : एक वाग्वैद्य . . . . . . . . . . . . . . . . . . ५४**
गणेश उमाकांत थिटे

**भाग - ३**

✦ **आपले सद्यकालीन स्वराज्य . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ५९**
प्रसन्न दाभोलकर

✦ **विद्यापीठाला सादर झालेले मराठीतील प्रबंध - २ . . . . . . . . . . . . ७६**
मुरारी पु. तपस्वी

✦ **पुस्तक परीक्षण :**
**सामान्यनीति : सामूहिक शहाणिवेची संक्षेपरूपे . . . . . . . . . . . . १०४**
आसावरी गोखले

---

✦ अमृतमहोत्सव बोधचिन्ह : सौ. चिरंतना दीक्षित, पुणे

✦ मुखपृष्ठ : श्री. सलील वाघ, पुणे

✦ मुखपृष्ठाविषयी -

शीर्षक - 'मिनिमम गव्हर्नन्स - मॅग्झिमम सर्व्हिलन्स.' मिश्रमाध्यमांत. हातकागदावर. आकार ८.५X१२ इंच. अमूर्त आणि मितव्यापी (Abstract & Minimlistic) शैलीतले हे चित्र असून ते समकालीन मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर उपस्थित असणा-या अमानवी पाळतीकडे निर्देश करते. (२०२२)

**भाग - २**

# राष्ट्रगुरुंचे पुण्यस्मरण

पृथ्वीराजसिंह प्रतापसिंह ठाकूर

लोकमान्य टिळक हे त्यांच्या हयातीतच एक आख्यायिका बनले होते. त्यांचा अलौकिक व अतुलनीय स्वार्थत्याग, त्यांचा बाणेदार व करारी स्वभाव, त्यांची अनुपमेय व सर्वसंचारी विद्वत्ता आणि त्यांचे पराकोटीचे देशप्रेम व धवल चारित्र्य या सर्व गुणांचा देशभरात बोलबाला होता आणि साध्याभोळ्या, अशिक्षित, खेडूत भारतीय बहुजन समाजात तर त्यांच्याबद्दल अनेक अद्‌भुतरम्य आख्यायिकाही प्रसिद्ध होत्या. ते ईश्वरी अवतार आहेत - इथपासून, तर त्यांनी मनात आणल्याबरोबर त्यांच्या कारागृहाची कुलुपे आपोआप गळून पडली किंवा ते अगदी नवसाला पावतात - इथपर्यंत त्यांच्याविषयी अनेक दंतकथाही प्रचलित होत्या. टिळकांची लोकोत्तर योग्यता त्यांचे अनेक सहकारी एवढेच नव्हे, तर त्यांचे अगदी कट्टर विरोधकही जाणत होते. असंख्य लोकांचा विविध कारणांनी टिळकांशी संबंध आला. वेगवेगळ्या विषयांवर त्यांचा सल्ला व मार्गदर्शन घेण्यासाठी तसेच त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी अनेक लहान-थोर येत. त्यांची मदत तर कोण व कशासाठी मागेल याचा नेम नसे. राष्ट्रजागृतीचे कार्य करतानाच एकीकडे लोकसंग्रह व लोकशिक्षण ही कामेही सर्वप्रकारे टिळक करत होते. आयुष्याची जवळपास पन्नास वर्षे ते सार्वजनिक जीवनात सक्रिय होते नव्हे, आघाडीवर होते. त्यातील सुमारे पंचवीस वर्षे तर ते भारतवर्षाचे निर्विवाद नेते होते. न्यायमूर्ती रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. ॲनी बेझंट, लाला लाजपत राय, बिपीनचंद्र पाल यांच्यासारख्या तेजस्वी महापुरुषांच्या नक्षत्रमंडळात टिळक सर्वांत उठून दिसत. अशा या शतकातून एकदा निर्माण होणा-या महापुरुषाच्या सानिध्यात आलेल्या लहानथोरांकडून त्यांच्या संबंधीच्या आठवणी मिळवून त्या प्रसिद्ध केल्यास पुढच्या पिढ्यांसाठी तो एक प्रेरणादायी दस्तऐवज तसेच भावी चरित्रकारांसाठी एक अनमोल साधनग्रंथ ठरेल, हे टिळकांचे एक सहकारी व त्यांचे परमभक्त असलेले सदाशिव विनायक बापट यांनी अचूक ओळखले. टिळकांशी देश-विदेशातील ज्या-ज्या लहानथोरांचा या ना त्या कारणाने संबंध आला व ज्यांच्या ज्यांच्या जवळ टिळकांशी संबंधित विशेष सांगण्यासारख्या व प्रेरणादायी आठवणी असण्याची शक्यता असेल अशा सर्वांना बापटांनी पत्रे पाठवून, वर्तमानपत्रातून जाहीर आवाहन करून, एवढेच नव्हे तर प्रवास करून व प्रत्यक्ष भेटी देऊन आपल्या निर्व्याज टिळक भक्तीपोटी टिळकांविषयीच्या आठवणींचा मोठा खजिना गोळा केला व तो तीन खंडांत प्रसिद्ध केला.

बापट *केसरी*त पत्रकार होते. लोकमान्यांच्या सान्निध्यात राहिलेले होते. सातारा जिल्ह्यात बोरखळ या आपल्या मूळ गावी त्यांनी टिळकाचे एक मंदिरच बांधायला घेतले होते, इतके त्यांचे टिळकप्रेम पराकोटीचे होते. आपल्या प्रचंड कामाची सुरुवात त्यांनी ३१ जुलै १९२३च्या *केसरी*तून जाहीर विनंती करून केली. आठवणींचा पहिला खंड सुमारे वर्षभरात टिळकांच्या जयंतीदिनी १९२४ साली म्हणजेच टिळकांच्या निधनानंतर चार वर्षांनी प्रसिद्ध झाला. पहिल्या खंडाच्या प्रकाशनानंतर एका वर्षातच यात समाविष्ट होऊ न शकलेल्या व उशिरा हाती आलेल्या आठवणी दुस-या खंडाच्या रूपाने प्रकाशित करण्याचे बापट यांनी ठरवले आणि पहिल्या खंडानंतर एका वर्षातच दुसरा खंडही प्रकाशित झाला. पुढे आठवणींचा हा ओघ कायम राहून संकल्पित नसलेला तिसरा खंडही बापटांनी प्रकाशित केला. १९२८ साली टिळकांच्या पुण्यतिथीला हा तिसरा खंड प्रकाशित झाला. या तिन्ही खंडांतील टिळकांसंबंधीच्या काही आठवणी, या आठवणी कमी व आख्यायिका अधिक असल्याने या ग्रंथाचे नाव *लोकमान्य टिळक यांच्या आठवणीआणि आख्यायिका* असे ठेवण्यात

आले. गेली अनेक दशके हा ग्रंथ (अर्थात हे तिन्ही खंड) आउट ऑफ प्रिंट म्हणजे मुद्रणबाह्य असल्याने आजतागायत अनुपलब्ध होते. परंतु २०२० हे लोकमान्यांचे स्मृतिशताब्दी वर्ष असल्याने या दुर्मिळ झालेल्या ग्रंथाचे पुनःश्च संपादन करून पुनर्मुद्रण करण्याचे परममित्र प्रकाशनाने ठरवले व २०१८ मध्ये येऊ घातलेले हे तिन्ही पुनर्मुद्रित खंड ब-याच परिश्रमांती अखेर जानेवारी २०२० मध्ये प्रकाशित झाले. हे तिनही खंड पाहिल्या-वाचल्यानंतर स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त टिळकांना दिलेली ही सर्वश्रेष्ठ वाङ्मयीन आदरांजली आहे हे सहज पटते. अत्यंत उच्च दर्जाच्या व सुंदर अशा कागदावर आकर्षक पुठ्ठा बांधणीत हे खंड छापल्याने पुस्तकाच्या अंतरंगाला शोभेल असेच त्याचे बाह्यांग झाले आहे.

बापटांनी या आठवणी गोळा करण्यासाठी व त्या प्रकाशित करण्यासाठी फार कष्ट केले व चिकाटीची कमाल केली. टिळकांसंबंधीच्या आठवणी गोळा करण्यासाठी त्यांनी सर्व लहान-थोर मान्यवरांना हजारो पत्रे लिहून पाठवली व त्यानंतर वारंवार स्मरणपत्रेही पाठवली. यातील अनेकांनी ही संधी साधून मोकळेपणाने त्यांच्या लोकमान्यांविषयीच्या आठवणी सांगून त्यांची थोरवी गाईली, पण इतर अनेकांकडून आठवणी मिळवताना बापटांना बरेच कष्ट पडले. वारंवार स्मरणपत्रे पाठवावी लागली त्यांच्याच शब्दात सांगायचे तर - "परद्वीपस्थ गौरकाय गृहस्थांनी मात्र पहिल्याच पत्रास उत्तरे पाठवली."

हे वाचून स्वकीयांच्या थंडपणाबद्दल जसा खेद वाटतो तसेच पाश्चात्त्यांच्या गुणग्राहकतेचे कौतुकही वाटते. भारतीय मानसिकतेत आजही फारसा फरक पडलेला नाही. एक तर आरत्याच ओवाळायच्या किंवा सरळ उपेक्षाच करायची हाच अजूनही आपला खाक्या आहे. आता तर महापुरुषांची जातवार विभागणीही झाली आहे. भावनाही फारच हळव्या झाल्या आहेत. कशाने दुखावल्या जातील याचा नेम नाही. असो, तर सदाशिव विनायक बापट यांच्या चिकाटीमुळे व अविश्रांत उद्योगामुळे आपल्याला टिळकांचे हे बहुरंगी व मनोज्ञ दर्शन घडले आहे.

तिस-या खंडाच्या प्रस्तावनेत तर बापट यांनी आपण प्रत्येक खंडासाठी किती लोकांना किती पत्रे लिहिली व त्यांपैकी किती लोकांनी आपल्या आठवणी पाठवल्या याची सविस्तर आकडेवारीच दिली आहे. त्याचप्रमाणे, या आठवणी लिहिणा-या व्यक्तींची त्यांच्या व्यवसायानुसार विभागणी करून त्याचीही आकडेवारी दिली आहे. बापटांनी हे तिनही खंड मिळून टिळकांच्या आठवणींची एकूण १८७५ पाने प्रसिद्ध केली. यासाठी त्यांनी एकूण १५६७ लोकांना ५९९२ पत्रे लिहिली. यांपैकी केवळ ७०१ लोकांनी आपल्या आठवणी पाठवल्या. म्हणजे सुमारे पन्नास टक्क्यांहून अधिक लोकांनी आपल्या आठवणी वेगवेगळ्या कारणांनी पाठवल्या नाहीत. त्या पाठवल्या असत्या तर आठवणींचा हा खजिना आणखी किती समृद्ध झाला असता, याची सहज कल्पना करता येईल.

या आठवणींमधून टिळकांचे होणारे दर्शन हे फार विस्तृत व बहुविध आहे. कोणताही चरित्रग्रंथ चरित्रनायकाचे इतके विविधांगी दर्शन घडवू शकत नाही. कारण एक तर चरित्र लेखनाला मर्यादा असतात, व दुसरे म्हणजे कितीही तटस्थपणे लिहिले तरी लेखकाचा म्हणून काहीएक दृष्टिकोण त्यात प्रतिबिंबित होतोच. आज अविश्वसनीय वाटावी अशी लोकप्रियता, देशासाठी केलेला अतुलनीय स्वार्थत्याग व सामान्यातल्या सामान्य माणसाच्याही प्रबोधनासाठी व उन्नतीसाठी असलेली निःस्वार्थ तळमळ या गुणांमुळे टिळक केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील जनतेसाठी प्रातःस्मरणीय व पूज्य बनले होते. त्यावेळच्या इतर कोणत्याही राष्ट्रीय पुढा-यापेक्षा टिळकांची लोकप्रियता कितीतरी अधिक होती. अगदी सामान्य खेडूत, शेतकरी व शेतमजूर यांपासून तर बाबू अरविंद घोष, लाला लजपतराय यांसारख्या राष्ट्रनेत्यांपर्यंत आणि एवढेच नव्हे तर अगदी मॅक्सम्युलरसारख्या जागतिक कीर्तीच्या प्राच्यविद्यापंडितापर्यंत सर्वजण टिळकांना

मानत व त्यांच्याबद्दल पराकोटीचा आदरभाव ठेवत. १८९७ साली टिळक राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यानंतर तुरुंगात असताना मॅक्सम्युलर व इतर अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या प्राच्यविद्यापंडितांनी - 'टिळकांना मुक्त करावे, कारण ते एक श्रेष्ठ विद्वान आहेत व त्यांना नाहक तुरुंगवास घडल्याने ज्ञानाच्या क्षेत्राची हानी होत आहे' असा अर्ज इंग्रज सरकारला केला होता. टिळकांनीही मॅक्सम्युलरला आपली *आर्क्टिक होम इन वेदाज* व *ओरायन* ही पुस्तके भेट दिली होती. त्यांचा एकमेकांशी पत्रव्यवहारही होता.

टिळकांची बुद्धिमत्ता हा एक प्रचंड असा चमत्कारच होता. या आठवणींमध्ये जागोजागी टिळकांच्या असामान्य बुद्धिवैभवाचे दाखले त्यांच्या विद्यार्थ्यांनी, त्यांच्या सहका-यांनी, समव्यावसायिकांनी व समकालीन विद्वानांनी, सामान्य लोकांनी, आणि त्यांच्या कुटुंबीयांनीही सांगितलेले आहेत. टिळक न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित व संस्कृत हे दोन विषय शिकवत. फळ्याकडे पाठ करून गणिताचे उदाहरण तोंडी सांगत विद्यार्थ्याला फळ्यावरच लिहायला लावायचे व तसेच मागे न वळता तोंडी सोडवून दाखवायचे असे ते नेहमी करत. अनेकदा आपल्या गुरूंची परीक्षा पाहण्यासाठी विद्यार्थी पुस्तकांमधून निवडून निवडून अत्यंत क्लिष्ट व अवघड गणिते तास संपताना त्यांना विचारत आणि डायसवरून उतरता उतरता टिळक - "त्यात काय एवढे?" - असे म्हणून तोंडीच ती गणिते सोडवून हसत हसत ते निघून जात. प्रख्यात गणिती केरूनाना छत्रे यांचे लोकमान्य टिळक हे शिष्य होते व टिळकांना याचा फार अभिमान वाटे. 'मी केरूनानांचा शिष्य आहे', असे ते अभिमानाने सांगत. प्रथम तुरुंगवासापूर्वी काही वर्षे टिळकांनी कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी शिकवणी वर्गही घेतले होते. एक कायदेतज्ज्ञ म्हणूनही टिळक चमकले. किचकट असा हिंदू लॉ शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता. ब्युरोक्रसी या इंग्रजी शब्दाला 'नोकरशाही' हा मराठी प्रतिशब्द टिळकांनीच दिला व विदर्भातील आकोट येथील एका सभेत बोलतांना त्यांना तो सुचला, हे या आठवणी वाचतानाच कळते. ज्योतिर्गणित (ॲस्ट्रॉनॉमी) हाही एक टिळकांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. एक सर्वमान्य असे शास्त्रशुद्ध पंचांग असावे असे टिळकांना फार वाटे. या क्षेत्रातही त्यांचा अधिकार फार मोठा होता. इतका, की सांगली येथे भरलेले ज्योतिष संमेलन त्यांच्याच अध्यक्षतेखाली भरले होते. वैदिक संस्कृती, वेदांचा कालनिर्णय हे टिळकांच्या आवडीचे व अभ्यासाचे विषय. वेदांतील नक्षत्र आदींच्या वर्णनावरून ज्योतिर्गणिताच्या आधारे वेदांचा काळ निश्चित करणारा *ओरायन* हा ग्रंथ टिळकांनी लिहिला. तसेच वेदांतील भौगोलिक वर्णनावरून आर्यांचे मूळ वसतीस्थान उत्तर ध्रुव असावे हा सिद्धान्त या ग्रंथात त्यांनी मांडला. *श्रीमद्‌भगवद्‌गीते*चे वाचन, मनन व त्यावर चिंतन टिळक आयुष्यभर करत आले होते. त्याचीच फलश्रुती म्हणजे *गीतारहस्य* हा त्यांचा ग्रंथराज होय. *गीतारहस्या*चे लेखन, त्याचे प्रकाशन व त्याची प्रकाशनपूर्व तसेच प्रकाशनोत्तर प्रसिद्धी यासंबंधी बापटांनी ज्या रम्य आठवणी संकलित केल्या आहेत, त्यांचेच एक *गीतारहस्य-चरित्र* होऊ शकेल. यातीलच एक हृद्य आठवण म्हणजे - मंडालेला जाणा-या पुस्तकांच्या व इतर सामानाच्या लाकडी पेट्या तयार करणारा बाबू सुतारही पेटीच्या आतल्या बाजूस पेन्सिलीने "बाबू सुताराचे दंडवत" असे लिहून टिळकांप्रती आपला आदर व्यक्त करत असे.

भोळेभाबडे सामान्य खेडूत लोकही पुण्याचा हा ब्राम्हण आपल्या भल्यासाठी, आपल्याला चांगले दिवस यावेत यासाठी सर्व प्रकारचे कष्ट सोसून आनंदाने तुरुंगवास भोगतो आहे हे जाणून होते आणि टिळकांची थोरवी ओळखून होते. हे सामान्य लोकही टिळकांना आपापल्या परीने मदत करू पाहात. एकदा एका दौ-याच्या वेळी जंगलातील आडवाटेने जाताना, टिळकांना पाहून काही बेरड लोकांनी त्यांना ओळखले व त्यांच्या पायांवर डोके ठेवून - 'आपण तुमच्यासाठी वाटेल ते काम करू फक्त आज्ञा करा' - अशी

विनवणी करू लागले. तेव्हा, त्या भाबड्या लोकांचा भाव पाहून टिळकांना गहिवरून आले. एका स्त्रीने तर आपला मुलगा आजारातून उठल्यास त्याला टिळकांच्या पायांवर घालीन म्हणून चक्क असा नवस बोलला होता. आश्चर्य म्हणजे तिचा मुलगा बराही झाला. तिनेही मोठ्या हिकमतीने नाशिक रेल्वे स्टेशनवर टिळकांना गाठून आपला नवस फेडला. त्यावर दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या मिश्किल स्वभावाला अनुसरून "बळवंतराव, तुम्ही नवसाला पावता हे आम्हाला आजच कळले बुवा!" अशा शब्दांत लोकमान्यांची फिरकीही घेतली.

सवंग डिजिटल लोकप्रियतेच्या आजच्या युगात या सर्व गोष्टी अविश्वसनीय वाटतात. टिळकांच्या प्रचंड लोकप्रियतेचे असे अनेक प्रसंग या आठवणींमध्ये आपल्याला वाचायला मिळतात. सेलिब्रिटी कशाला म्हणतात हे ज्यांना जाणून घ्यायचे असेल, त्यांनी या आठवणी आवर्जून वाचाव्यात.

भारतीय अध्यात्मपरंपरेतील श्रेष्ठतम अशा मूल्यांवर टिळकांचा पिंड पोसलेला होता. *वेद* व *गीता* यांच्यावर टिळक जे बोलले व त्यांनी जे लिहिले, ते सर्व 'प्रचीतीचे बोलणे' होते. हे महाग्रंथ त्यांनी पूर्णपणे पचविले होते, आचरणात आणले होते. गीतेतला निष्काम कर्मयोग जगलेला आपल्या काळाला सर्वाधिक जवळचा असणारा महापुरुष म्हणजे बाळ गंगाधर टिळक. सुख दुःख, लाभ-हानी, मानापमान, यश-अपयश या सर्वांना समान मानणारी स्थितप्रज्ञवृत्ती ही टिळकांची सहजस्थिती कशी बनली होती यासंबंधीचे भरपूर दाखले बापटांच्या या आठवणींच्या संकलनात आपल्याला वाचायला मिळतात. ज्येष्ठ मुलाचा व पुढे पत्नीचा अकाली मृत्यू, ताईमहाराज प्रकरणात घडलेला मनस्ताप, प्रदीर्घ तुरुंगवास, सरकारी छळ, मधुमेहासारखा त्याकाळी जास्तच दुर्धर असणारा आजार आणि देशकारणासाठी अविश्रांत कष्ट व अखंड दगदग या सर्व प्रतिकूलतेला तोंड देताना टिळकांनी आपली समतोल वृत्ती कधीच कशी ढळू दिली नाही याचे कारण आपल्याला समजून घ्यायचे असेल तर या आठवणी वाचाव्यात. केवळ बहुतांची अंतरे राखता यावीत म्हणून प्रचंड शारीरिक, मानसिक व आर्थिक झीज लोकमान्यांनी सतत सोसली.

टिळकांच्या खाजगी आयुष्यावर या आठवणी बराच प्रकाश टाकतात. अनासक्त वृत्ती व कमालीचा आत्मसंयम हे टिळकांचे गुणविशेष अगदी त्यांच्या रोजच्या खाजगी जीवनातही प्रतिबिंबित झालेले आपल्याला दिसून येतात. मधुमेहाला नियंत्रणात ठेवण्यासाठी टिळकांनी वर्षानुवर्षे कडक पथ्य पाळले. त्यांचा त्यांच्या जिभेवर फार संयम होता. ते केवळ जगण्यासाठी खात. खाण्यासाठी जगत नसत. आपण अस्वादव्रताचे श्रेय गांधीजींना देतो, पण या आठवणी वाचल्या म्हणजे टिळक हे गांधीजींच्या आधीचे व त्यांच्या तोडीचे अस्वादव्रती होते हे कळते. सुपारी खाण्याची आवड टिळकांना होती, पण त्याविषयी आसक्ती नव्हती.

पराकोटीचे ग्रंथप्रेम हा टिळकांचा आणखी एक गुणविशेष या आठवणींमधून प्रकर्षाने दिसून येतो. टिळकांचा ग्रंथसंग्रह हा त्यांच्या व्यासंगासारखाच अफाट होता. गायकवाडवाड्यातील एक प्रशस्त हॉल व आणखी काही दालने या ग्रंथसंग्रहाने व्यापली होती. आपल्या संग्रहातील प्रत्येक पुस्तकाची खडान्‌खडा माहिती टिळकांना होती. कोणते पुस्तक कुठे ठेवले आहे हे ते केवळ स्मरणातून अचूक सांगू शकत असत. मंडालेच्या तुरुंगातून आपले भाचे धोंडोपंत विद्वांस यांना लिहिलेल्या पत्रांमधून आपल्याला हवी ती पुस्तके कुठे आहेत हे अचूक सांगून नेमकी ती पुस्तके ते मागवत. पुस्तकांबाबत लोकमान्य फारच 'पझेसिव्ह' होते. त्यांचे सहकारी तात्यासाहेब केळकर एका प्रसंगी म्हणाले :

"लायब्ररीच्या कामांत बळवंतराव अगदी माथेफिरु आहेत. एखाद्याला नेसते धोतरसुद्धा देतील, पण जवळच्या पुस्तकाला हात लावूं देणार नाहीत." (खंड १, पृ. ३२०)

मात्र एखाद्या गरजू होतकरू विद्वानाला संशोधनासाठी हवे असल्यास टिळक त्याला आपल्या

ग्रंथालयाचा वापर मुक्तपणे करू देत.

बापट यांच्या या आठवणींच्या संकलनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आठवणी गोळा करताना केवळ टिळकांचे अनुयायी मित्र, सहकारी, व प्रशंसक यांचाच विचार केला नाही, तर टिळकांशी गंभीर मतभेद असणा-या किंवा टिळकांच्या हयातीत त्यांना सतत विरोध करत असलेल्या लोकांचाही विचार केला आहे व त्यांनाही टिळकांसंबंधीच्या आपल्या आठवणी लिहिण्यास प्रवृत्त केले आहे. तिस-या खंडात तर टिळकांचे एक कट्टर विरोधक असलेले व ज्यांच्याविरुद्ध टिळकांनी इंग्लंडमध्ये जाऊन अब्रुनुकसानीचा दावा करून खटला लढवला असे सर व्हॅलेंटाईन चिरोल यांचाही टिळकांविषयीच्या आठवणीवजा लेख प्रसिद्ध करण्यात आला आहे. चिरोल यांच्यावर दाखल केलेल्या याच खटल्यात टिळकांना प्रचंड मनस्ताप व भुर्दंड सोसावा लागला व टिळक हा खटला हरले. परंतु या खटल्याच्या माध्यमातून त्यांनी ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेचे ढोंग उघडे पाडले. चिरोल यांनी आपल्या लेखात एकीकडे टिळकांना जहाल व सनातनी ठरवले आहे, तर दुसरीकडे त्यांचा “He was a born leader of men...” असा गौरवही केला आहे. टिळकांची विद्वत्ता व त्यांनी आयुष्यभर केलेला विद्याव्यासंग, याबद्दलही चिरोल यांनी गौरवोद्‌गार काढले आहेत.

बापटांच्या संकलनात तिस-या खंडांमध्ये बॅरिस्टर जिना यांचाही विस्तृत आठवणीवजा लेख प्रकाशित झाला आहे. अनेकांना कदाचित हे माहीत नसेल की, १९०८ साली टिळकांवर झालेल्या राजद्रोहाच्या दुस-या खटल्याच्यावेळी टिळकांच्या बाजूने खटला लढविणा-या वकीलांमध्ये बॅरिस्टर महंमद अली जिना यांचासुद्धा समावेश होता. जिना यांना टिळकांबद्दल फार आदर होता. एक चतुर राजकारणी, नि:स्वार्थ देशभक्त व विशाल राष्ट्रव्यापी दृष्टिकोण असलेले थोर नेते म्हणून बॅरिस्टर जिना यांनी टिळकांचा गौरव केला आहे. टिळकांचे अफाट बुद्धिवैभव व त्यांचा राष्ट्रव्यापी दृष्टिकोण यामुळे ते आपल्या आदरास पात्र झाले असे जिना म्हणतात.

टिळकांचे जिवलग मित्र व सहकारी अमरावतीचे सुप्रसिद्ध वकील व नेते - गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे हे नियमित रोजनिशी लिहीत. खापर्डे यांच्या रोजनिश्यांचे अनेक खंड प्रसिद्ध झाले आहेत. जवळजवळ चाळीस पंचेचाळीस वर्षे खापर्डे नियमितपणे रोजनिशी लिहीत होते. बापटांनी आपल्या तीन खंडांमध्ये दादासाहेब खापर्डे यांच्या रोजनिश्यांमधून टिळकांबद्दल अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती व संदर्भ देणारे अनेक उतारे मुक्तपणे दिले आहेत. तिस-या खंडाला तर प्रस्तावनाच मुळी दादासाहेब खापर्डे यांची आहे. दादासाहेबांनी यात टिळकांच्या निधनानंतरच्या भारतीय राजकारणाचा आढावा घेऊन बदलत्या परिस्थितीबद्दल व नवीन (पक्षी महात्मा गांधींच्या) नेतृत्वाबद्दल मोठा निराशेचा सूर काढला आहे. खापर्डे यांना गांधीजींचे राजकारण अनाकलनीय वाटत असे. एका कट्टर टिळकानुयायाची त्यांच्या पश्चात उदयास आलेल्या गांधीजींकडे व त्यांच्या एकंदरीतच राजकीय व सामाजिक गतिविधींकडे पाहण्याची दृष्टी कशी होती हे खापर्डे यांच्या प्रस्तावनेतून आपल्याला दिसून येते. लोकमान्य टिळक व गांधीजी यांच्या राजकारणाचा तुलनात्मक अभ्यास करणा-यांसाठी दादासाहेब खापर्डे यांची ही प्रस्तावना फार महत्त्वाची आहे.

परदास्यातून आपल्या देशाची सुटका व सर्वांगीण उन्नती याशिवाय टिळकांना दुसरा ध्यासच नव्हता. हा ध्यास घेऊनच सर्व स्तराच्या व सर्व प्रकारच्या लोकांचा संग्रह लोकमान्यांनी आयुष्यभर केला. प्रत्येक मनुष्याचा राष्ट्रोद्धार व राष्ट्रनिर्मिती यांच्यासाठी उपयोग कसा करून घेता येईल याचाच सतत विचार त्यांनी केला. कोणताही मनुष्य असो व त्यात कितीही दोष असोत, मात्र जर राष्ट्रकार्याकडे त्याचा उपयोग करून घेता येत असेल, तर टिळक त्याच्या इतर दोषांकडे आनंदाने दुर्लक्ष करत या आठवणी वाचल्या म्हणजे टिळकांवर सनातनी व सुधारणाविरोधी असल्याचा जो आरोप केला जातो, तो

किती निराधार आहे व टिळकांवर कसा अन्याय करणारा आहे, याची प्रचिती येते. एकच मनुष्य सर्वच क्षेत्रात कर्तृत्व गाजवू शकत नाही हे जाणून भारतमातेच्या वेगवेगळ्या सुपुत्रांनी वेगवेगळी कार्यक्षेत्रे निवडली. मात्र सर्वांचे ध्येय एकच होते - राष्ट्राचे कल्याण व राष्ट्राचा अभ्युदय. टिळकांनी स्वतःसाठी परदास्याविरुद्ध राजकीय चळवळीचे क्षेत्र निवडले होते. ते सुधारणा विरोधी नव्हते. मात्र सुधारणांची प्रक्रिया कधीही न संपणारी असते. सुधारणांना सदैव व सतत वाव असतोच. त्यामुळे आधी सुधारणा व नंतर स्वतंत्र मार्गाने गेल्यास अनंतकाळापर्यंत स्वातंत्र्य मिळवणे शक्य होणार नाही. त्यामुळे अगोदर परकीय सत्तेपासून मुक्ती मिळवावी व नंतर आपल्या लोकांमध्ये सुधारणा आपल्या आपणच सर्वांच्या सहकार्याने कराव्यात, असा त्यांचा दृष्टिकोण होता. याशिवाय राजकीय चळवळीचे क्षेत्र आपण आपल्यासाठी निवडले असले तरी सर्वांनी त्याच क्षेत्रात कार्य करावे असा टिळकांचा दुराग्रह मुळीच नव्हता. ज्यांना सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात काम करावयाचे आहे त्यांनी ते अवश्य करावे, मात्र प्रत्येकाने सामाजिक सुधारणांसाठीच कार्य करावे असा आग्रह न धरता, आपल्यापेक्षा वेगळ्या क्षेत्रात काम करणा-या व्यक्तीबद्दल आदर व सहिष्णुता ठेवावी असे टिळकांचे मत होते.

समाजाच्या खूप पुढे राहणे राष्ट्रीय नेतृत्वाला कधीही इष्ट नसते. नेत्याने नेहमी समाजाच्या एकच पाऊल पुढे असावे. स्वतःला काहीही वाटत असले तरी कुठलाही बदल समाजाला पचेल व रुचेल अशा प्रकारे हळूहळू, परंतु स्थायी स्वरुपात घडवून आणावा हा लोकमान्यांचा दृष्टिकोण होता. १९०७ सालची सुरत काँग्रेस टिळकांमुळे दुभंगली असाही त्यांच्यावर आरोप केला जातो. मात्र आठवणींच्या या खंडांमध्ये टिळकांनी जहाल व मवाळ दोघांमध्ये समेट घडून यावा यासाठी किती कष्ट केले, किती मानहानी सोसली आणि आपली वैयक्तिक प्रतिष्ठा बाजूला सारून किती इमानेइतबारे प्रयत्न केले, याची साक्ष अनेक लोकांच्या आठवणीत मिळते. सुरतेला मंडपात खुर्च्यांची व इतर वस्तूंची फेकाफेक होत असताना टिळक निर्भयपणे हात बांधून व्यासपीठावर कसे ठामपणे उभे होते हे दृश्य पाहिलेल्या अनेकांच्या आठवणी या तीन खंडांमध्ये वाचायला मिळतात.

अशा प्रकारे विराट कर्तृत्वाचा धनी असलेला हा महापुरुष सामान्यातल्या सामान्य माणसांपासून तर मोठ्यातल्या मोठ्या विभूतीपर्यंत सर्व स्तरांतील लोकांना कसा दिसला, कसा भावला व त्याच्या अतुलनीय तेजाने त्याने जगाला कसे दिपवले, याचे मनोज्ञ दर्शन आपल्याला बापटांच्या आठवणींच्या संकलनाचे हे तीन खंड वाचल्यानंतर घडते व राष्ट्रगुरू लोकमान्यांच्या स्मरणाच्या पुण्यसरितेचे सचैल स्नान घडून हृष्यामि च पुनः पुनः अशी संजयासारखी आपलीसुद्धा अवस्था होते.

या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन करून परममित्र प्रकाशनाने फार मोठे धाडस केले आहे व मराठी सारस्वताला ऋणी करून ठेवले आहे, यात शंका नाही. सर्वच दृष्टींनी हे खंड अत्यंत वाचनीय व संग्राह्य झाले आहेत.

**ग्रंथाचे नाव - लोकमान्य टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका (३ खंड)**

संग्राहक व संपादक : सदाशिव विनायक बापट
विशेष आवृत्तीचे संपादक : सुनील कर्णिक
स्मृतिशताब्दी विशेष आवृत्ती : जानेवारी २०२०,
परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे.
(http://parammitrapublications.com/)
तिन्ही खंडाची एकत्रित किंमत : रु. २७००/-

भ्रमणध्वनी - ९८८१७२११९३

✠ **डॉ. पृथ्वीराजसिंह प्रतापसिंह ठाकूर**

गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव (जिल्हा - बुलढाणा) येथे इंग्रजीचे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत. 'भाषांतरातील समाज भाषाशास्त्रीय समस्यांचे अध्ययन' या विषयावर पीएच.डी. ही पदवी प्राप्त. भाषांतर, शेक्सपिअर व इंग्रजी भाषा शिक्षणामध्ये विशेष आवड.
https://ppthakur.wordpress.com या ब्लॉगवर नियमित लेखन.

***पत्ता :–*** चांदमारी, चर्चसमोर, खामगाव, जि. बुलढाणा – ४४४३०३.
भ्रमणध्वनी – ९८८१७२११९३ **Email** - prithvithakur1@rediffmail.com

✠ **श्री. दिनेश पाटील**

लेखक महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगरचे विश्वस्त. महाराष्ट्र शासनाच्या महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत.

**पत्ता :-** प्लॉट नं. ११४, सत्यवती कॉलनी, जाखले-वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
भ्रमणध्वनी – ९६२३८५८१०४ **Email** - dineshpatil1942@gmail.com

✠ **प्रा. व्ही. डी. गायकवाड**

विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

***पत्ता :–*** राज्यशास्त्र विभाग, शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर –४१३५१७. (महाराष्ट्र)
भ्रमणध्वनी : ९४२३३४३४७३ **Email** - vishwambar10@gmail.com

✠ **प्रा. डॉ. गणेश उमाकांत थिटे**

सेवानिवृत्त विभाग प्रमुख व प्राध्यापक, संस्कृत विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. वाचक व लेखक म्हणून *नवभारत*शी दीर्घकाळ संबंध.

***पत्ता :–*** २१, एरंडवणे, गावठाण, म्हात्रे पुलाजवळ, पुणे ४११ ००४.
भ्रमणध्वनी – ९८२२९१२०८१ **Email** - guthite@gmail.com

✠ **डॉ. प्रसन्न देवदत्त दाभोलकर**

MBBS आणि MD (Psychiarty) MA (तत्त्वज्ञान) भाषांतर, काव्यलेखन, वैचारिक आणि मुलांसाठी लेखन. रामकृष्ण मठ नागपूर यांच्या मासिकात 'ध्यानसमयी' हे भाषांतर क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

**पत्ता :-** शांतिनिकेतन, ४३, गुरुकृपा कॉलनी, शाहूनगर, सातारा - ४१५००१
भ्रमणध्वनी : ९४२१११९२१७ **Email** - prasannadabholkarpri@gmail.com

✠ **डॉ. मुरारी पु. तपस्वी**

राष्ट्रीय समुद्र विज्ञान संशोधन संस्थेमधून मुख्य शास्त्रज्ञ (ग्रंथालय) या पदावरून निवृत्त. विज्ञान विषयाचे आणि ग्रंथालय शास्त्राचे पदव्युत्तर, पदवीधर आणि सायंट्रोमेट्रिक्समध्ये पीएच.डी.. सायंटोमेट्रिक्सचे तंत्र वापरून प्रकाशित संशोधन साहित्याचे मूल्यमापन. उच्च शिक्षण संस्थांमधून सचोटी आणि सक्षमीकरणावर व्याख्याने. मराठी विज्ञान परिषदेतर्फे *संशोधन आणि माहितीसाधने* हे इ-पुस्तक प्रकाशित. मोकळ्यावेळेत भारतीय संशोधनावर सोप्या भाषेत ब्लॉग लेखन.

**पत्ता :-** ४, सिंगबाळ बिल्डींग, टोंका, करंझाळे, गोवा - ४०३००२.
भ्रमणध्वनी - ९७६३३४१९६७ **Email** - tapaswimurari@gmail.com

✠ **आसावरी केदार गोखले**

पुणे विद्यापीठातून एम. ए. (संस्कृत). गेली दहा वर्षे व्यावसायिक अनुवादक म्हणून कार्यरत. भाषेच्या अभ्यासामध्ये विशेष रुची. अनेक भाषाविषयक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग.

**पत्ता :-** १४, कल्पिका सोसायटी (तिसरा मजला), शिलाविहार कॉलनी, एरंडवणे, पुणे ४११०३८
भ्रमणध्वनी : ९२२५५२६३४६ **Email** - saygo512@gmail.com

✠ **मुखपृष्ठकार - सलील वाघ**

कवी. आजतागायत ७ कवितासंग्रह प्रकाशित. महत्त्वाचे मराठी कवी. जागतिकिकरणोत्तर मराठी कवितेवर मोठा प्रभाव. त्याचबरोबर, वैचारिक गद्य, अनुवाद आणि सैद्धान्तिक समीक्षात्मक लेखनही प्रकाशित. पुणे, मुंबई, अहमदाबाद इत्यादी अनेक विद्यापीठांमधून व तसेच गुजरात लिटररी फेस्टिव्हल, मुंबई पोएट्री फेस्टिव्हल इत्यादी आंतरभाषिक वाङ्मयीन संमेलनामधून मराठी कवितेचे प्रतिनिधित्व. भारतात विविध ठिकाणी चित्रकलेची अनेक एकल व सामुहिक प्रदर्शने. सध्या 'मराठी अभ्यास परिषद' या संस्थेचे अध्यक्ष व *भाषा आणि जीवन* या त्रैमासिकाच्या संपादक मंडळाचे तसेच *नवभारत*च्या संपादक मंडळाचे सदस्य. २००६ सालचा शब्दवेध पुरस्कार व २०१७ सालचा साहिर लुधियानवयी पुरस्कार या पुरस्काराने सन्मानित. स्प्रिंगर व्हर्ललॅग (जर्मनी) या प्रकाशनसंस्थेत विभाग-प्रमुख म्हणून काही काळ काम. सध्या पुण्यात जाहिरात व औद्योगिक सल्लासेवा देण्याचा व्यवसाय.

**पत्ता :-** ८१, कसबा पेठ, पुणे ४११०११ भ्रमणध्वनी : ९४२२५११२३८ **Email** - waghsaleel@gmail.com

---

## शुद्धिपत्रक

| | शुद्ध | अशुद्ध | | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|---|---|
| **पृ. १३** | प्रतिपादित | प्रतिपादन | **पृ. ३५** | सामूहिक | सामुहिक |
| **पृ. १३** | अपूर्व | अपूर्ण | **पृ. ३५** | सूक्ष्मवित्त | सूक्ष्मवित |
| **पृ. १४** | रसिकांवरील | रासंकावरील | **पृ. ३७** | आलेली | येणारी |
| **पृ. १५** | नमूद | नमुद | **पृ. ३७** | जमिनीची | जामनीची |
| **पृ. १५** | ? अनावश्यक | अनावश्यक ? | **पृ. ३८** | कमी | कभी |
| **पृ. १७** | अनेकविध | अनेकविश्ध | **पृ. ३८** | क्लिष्ट | क्रिष्ट |
| **पृ. १९** | पद्य | पद्म | **पृ. ४१** | कीटकनाशके | किटकनाशके |
| **पृ. १९** | त्यांचा | सांचा | **पृ. ४१** | योजनेला | योजनेता |
| **पृ. २५** | विश्रब्ध | विश्रद्ध | **पृ. ४५** | वरखेडें | वरखेडींसाठी |
| **पृ. २५** | पगार | पगौर | **पृ. ४६** | हरणा-या | हरणाच्या |
| **पृ. २५** | होत | हात | **पृ. ४७** | व्यापारोत्तेजक | व्यापरोत्तेजक |
| **पृ. २८** | करण्याचा | करण्याची | **पृ. ४८** | व्यूहात्मक | विव्हात्मक |
| **पृ. ३३** | महिला | माहिला | **पृ. ४९** | वैशिष्ट्ये | वैशिष्ट |
| **पृ. ३३** | मुले | मुळे | **पृ. ५३** | मोदींवर | मादींवर |
| **पृ. ३४** | लाभ | लाथ | **पृ. ५५** | ती | तो |

**'नवभारत'च्या वार्षिक वर्गणीसंदर्भातील / 'नवभारत'च्या देणगीसंदर्भातील आवश्यक माहिती**

वार्षिक वर्गणी - ५००/- रु. वर्गणी NEFT ने भरण्यासाठी बँकेचे तपशील –
खाते प्रकार - बचत खाते (सेव्हींग अकौंट)
Bank Name -- The Wai Urban Co-op Bank Ltd., Wai
५९१, Ganpati Ali, Wai, Tal - Wai, Dist. - Satara.
A/C Name -- Navbharat Masik
CBS A/C No -- ११०१०३१३०००१३३६
IFSC CODE -- SVCB००१६१०१

(SVCB नंतर O (ओ) नसून ० (शून्य) आहे. काही तांत्रिक कारणांमुळे बँकेने सुमारे महिनाभर IMPS बंद ठेवले आहे; पण NEFT चालू आहे.)
वर्गणीचा चेक पाठवायचा असल्यास कृपया या नावाने पाठवावा –
**'नवभारत' मासिक**
वर्गणी चेक, डीडी किंवा मनिऑर्डरने पाठवायची झाल्यास कार्यालयीन पत्ता –
नवभारत मासिक, प्राज्ञपाठशाळामंडळ, ३०९/३१०, गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा).
NEFT ने वर्गणी पाठवल्याचेही स्वतःच्या नाव–पत्त्यासह याच पत्त्यावर पत्राद्वारे कळवता येईल. त्याऐवजी SMS वा Whats App द्वारे कळवायचे झाल्यास नवभारत कार्यालयातील सौ. नीता गायकवाड (मोबाईल ९४२३८६६५५६) यांना मेसेज करावा. नवभारतला **देणगी** देण्यासाठी हीच पद्धत वापरावी.
'व्यवस्थापक, नवभारत' यांचा संपर्कासाठीचा दूरध्वनी क्रमांक - (०२१६७) २२०००६

## प्राज्ञपाठशाळामंडळास देणगी देण्यासाठी

वर दिलेल्या पद्धतीनेच देणगीची रक्कम जमा करावी. मात्र चेक, डीडी किंवा मनिऑर्डर पाठवायची झाल्यास ती या नावाने पाठवावी –
**प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई**
संपर्कासाठी पत्ता - सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, ३०९/३१०, गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा).
Bank Name -- The Wai Urban Co-op Bank Ltd., Wai
५९१, Ganpati Ali, Wai, Tal - Wai, Dist. - Satara.
A/C Name -- Pradnyapathashala Mandal
CBS A/C No -- ११०१०३१३००००००८४
IFSC CODE -- SVCB००१६१०१
(SVCB नंतर O (ओ) नसून ० (शून्य) आहे. काही तांत्रिक कारणांमुळे बँकेने सुमारे महिनाभर IMPS बंद ठेवले आहे; पण NEFT चालू आहे.)

**वर्गणी आणि देणगीचे स्वागत आहे.**